POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०४ ● मुंबई, शनिवार, ०६ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

पुणे विषारी दारु प्रकरणानंतर मोठी कारवाई

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून तब्बल 116 जणांना अटक

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक



पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडीत विषारी दारूमुळे 13 जणांचा मृत्यू झाला. यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर परिसरातील दारु अड्डे उद्धवस्त करत 116 जणांना अटक केली आहे.

पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडीत विषारी दारूमुळे 13 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली. फुगेवाडी विषारी दारू प्रकरणानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी शहरातील अवैध दारू विक्री आणि निर्मिती करणाऱ्या अड्डयांवर मोठी कारवाई सुरू केली आहे. यानंतर आता राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. तब्बल 116 जणांना अटक करण्यात आली आहे.

फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर येथील प्रथमदर्शनी मेथेनॉल मिश्रित गावठी दारू प्राशन घटनेनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून 29 मे ते 4 जून या कालावधीत धडक कारवाई करुन एकूण १ कोटी ४७ लाख २७ हजार १४५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे, अशी माहिती अधीक्षक अतुल कानडे यांनी दिली आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख, सह आयुक्त अंमलबजावणी व दक्षता , प्रसाद सुर्वे, पुणे विभागीय उपायुक्त सागर धोमकर, यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार पुणे विभागाने अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई केली आहे.

या कालावधीत एकूण 142 गुन्हे नोंद करण्यात आले असून एकूण 116 आरोपींना अटक करण्यात आलेले आहे. सदर गुन्ह्यामध्ये 8 हजार 472 लि. तयार गावठी दारू जप्त करण्यात आली असून गावठी दारू तयार करण्यासाठीचे 69 हजार 271 लि. रसायन जागीच नाश करण्यात आले आहे. तसेच 11 हजार 733 लि. परराज्यातील व बनावट मद्य ही जप्त करण्यात आले आहे. दारूच्या अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली एकूण 11 वाहने जप्त करण्यात आलेली आहेत.

सर्व विक्री व निर्मितीचे हॉटस्पॉट संवेदनशील गाव येथील हातभट्टी केंद्र नेस्तनाबूत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच हातभट्टी निर्मितीसाठी लागणारा कच्चामाल पुरवठादारांना गुन्ह्यात आरोपी करून कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सराईत गुन्हेगारा कडून महाराष्ट्र दारूबंदी कायदा 1949 चे कलम 93 नुसार चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्यासाठी एकूण 125 प्रस्ताव दाखल करण्यात आलेले आहेत.

मेथेनॉल मिश्रित दारूप्राशन करून नागरिकांचा मृत्यू झाल्याचा गुन्हा सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. त्या गुन्ह्याशी संबंधित राज्य उत्पादन शुल्क विभागाने 3 गुन्हे नोंदविले होते त्यांचा तपास सीआयडी सोबत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी पुणे व पिं. चि. मनपा आयुक्त यांना त्यांचे हद्दीमध्ये विषारी दारूचे दुष्परिणाम व त्यास प्रतिबंध घालण्यासाठी ध्वनिफीत घंटागाडीच्या ध्वनिक्षेपावरून वाजविणे तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून गावठी दारूच्या नोंदविलेल्या गुन्ह्याची ठिकाणे अवैध बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्याची विनंती केली आहे. अशाच प्रकारच्या सूचना सर्व नगरपरिषद, नगरपालिका, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्व उप विभागीय दंडाधिकारी, सर्व पोलीस उपायुक्त पुणे व पिंपरी-चिंचवड यांना विषारी दारूसारख्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सराईत गुन्हेगारांवर जरब बसण्यासाठी कलम 93 खाली अधिकाधिक रक्कमेचे बंधपत्र घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच,ग्रामसेवक, तलाठी यांना त्यांच्या गावामध्ये गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला देण्याबाबत व सरकारी जमिनीचा अवैध धंद्यांसाठी वापर होत असल्यास त्याला प्रतिबंध करण्याबाबत सूचना देण्याबाबतच्या सूचना (नोटीस) राज्य उत्पादन शुल्क विभाग मार्फत देण्यात आल्या आहेत. तसेच महावितरणलाही अशा अवैध दारू व्यवसायात गुंतलेल्या गुन्हेगारांना देण्यात आलेल्या अधिकृत किंवा अनधिकृत वीज जोडण्या तोडण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच गावठी दारू निर्मिती करणाऱ्यास गुळाचा पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यानाही कलम 168 खाली प्रतिबंधात्मक सूचना देण्यात आल्या आहेत.

मेथेनॉल बाबत सह आयुक्त, औषध प्रशासन विभाग यांना भेटून पुणे जिल्ह्यातील सर्व मेथेनॉल अनुज्ञप्ती धारक, पुरवठादार यांची यादी प्राप्त करून घेण्यात आलेली आहे. सर्व घटकांना राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेट देऊन भा.ना.सु. संहितेच्या कलम 168 नुसार नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत. औषध प्रशासन विभागाकडून मेथेनॉलच्या पुरवठादारांच्या व्यवहारांची तपासणी करून अवैध करण्यासाठी मेथेनॉलचा पुरवठा केल्यास कडक कारवाई करण्याबाबत विनंती केली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून नागरिकांना अवैध गावठी दारूपासून दूर राहण्याच्या व अशा बेकायदेशीर धंद्यात गुंतलेल्या गुन्हेगारांविषयी माहिती असल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा ०२०-२६१२७३२१ दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक अतुल कानडे यांनी केले आहे.

गोशाळेवरील कारवाईवरुन हिंदू समाज आक्रमक



■वसई। प्रतिनिधी,

नालासोपारा पश्चिम येथील शनी मंदिराजवळ असलेल्या गोशाळेवर महानगरपालिकेने केलेल्या तोडक कारवाईविरोधात हिंदू समाज आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गायी उपस्थित असतानाच जेसीबीद्वारे कारवाई करण्यात आल्याचा आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याच मागणीसाठी 7 जून रोजी महानगरपालिका कार्यालयावर आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली.

हिंदू समाजाच्या पत्रकार परिषदेत देण्यात आलेल्या माहितीनुसार, शनी मंदिराजवळील या गोशाळेत सुमारे 40 ते 45 गायींचे आश्रयस्थान होते. संबंधित जागा अनधिकृत असल्याचे सांगत महानगरपालिकेकडून यापूर्वी नोटिसा देण्यात आल्या होत्या. त्यानंतर 29 तारखेला सकाळी सुमारे 9 वाजता जेसीबीच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली. कारवाईच्या वेळी गोशाळेत गायी उपस्थित असतानाही जेसीबी चालविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. या कारवाईत काही गायी जखमी झाल्याचा दावा करत, प्रथम गायींच्या सुरक्षित स्थलांतराची व्यवस्था करून नंतर कारवाई करता आली असती, असे मत संघटनांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले. गायी असतानाच कारवाई करण्यात आल्याने महानगरपालिकेच्या भूमिकेबाबत संशय निर्माण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या घटनेनंतर हिंदू समाजातील विविध संघटनांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून, कारवाईदरम्यान जेसीबी चालविणाऱ्या ऑपरेटरची माहिती पोलिसांकडे उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला. तसेच ज्या ठिकाणी गोशाळेवर कारवाई करण्यात आली, त्या परिसरात इतरही अनेक अनधिकृत बांधकामे असल्याचा आरोप करत त्यांच्यावरही समान निकषांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. गोशाळा पाडण्यामागे कोणाचा हस्तक्षेप आहे का, त्यामागे कोणता वैयक्तिक किंवा अन्य स्वार्थ आहे का, याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनांनी केली. तसेच जखमी गायींवर तातडीने उपचार करून त्यांची योग्य काळजी घेण्याची मागणीही करण्यात आली. पत्रकार परिषदेत काही हिंदुत्ववादी संघटनांनी अनधिकृत मशिदी, मदरसे आणि चर्च यांच्यावर कारवाई होत नसताना गोशाळा आणि हिंदू धार्मिक स्थळांवर कारवाई केली जात असल्याचा आरोप केला. त्यामुळे हिंदू समाजात नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला. महानगरपालिकेचे लक्ष्य हिंदू समाजावर असल्याचाही आरोप यावेळी करण्यात आला.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाच्या निषेधार्थ तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी 7 जून रोजी हिंदू समाज आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने महानगरपालिका कार्यालयावर आंदोलन करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

नागपुरात एफडीएची मोठी कारवाई!

55 लाखांचे फ्रुट ड्रिंक जप्त, ओआरएसला पर्याय म्हणून विक्री

■नागपूर। प्रतिनिधी,



संशय आल्यास इथे साधा संपर्क

विश्लेषणासाठी घेण्यात आलेले नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही अन्नसुरक्षा मानदे कायदा २००६अंतर्गत करण्यात येईल. तोपर्यंत जप्त केलेला साठा सील करून ठेवला आहे. अन्नसुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निदेर्शानुसार जिल्ह्यातील अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांनी या कारवाया केल्या.

ओआरएसला पर्याय म्हणून परिचित 'एनर्झल' या पेयाची 'एनर्जी ड्रिंक' नावाने विक्री करण्यात येत असल्याचे लक्षात आल्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाईचा फास आवळला. या फ्रुट ड्रिंकचा (एनर्झल) ५५ लाख ६७ हजार ७७९ रुपये किमतीचा ३६ हजार ३६६ किलो साठा अन्न व औषध प्रशासन विभागाने जप्त केला. एफडीए नागपूरच्या गुप्तवार्ता विभागाला मिळालेल्या माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली.

एफडीएच्या गुप्तवार्ता विभागाचे साहाय्यक आयुक्त यदुराज दहातोंडे, अन्नसुरक्षा अधिकारी ललित सोयाम, रावसाहेब वाकडे, महेश चहांदे यांच्या पथकाने हिंगणा एमआयडीसी भागातील सोनेगाव येथील मे. एफ. डी. सी. लिमिटेड या वितरक पेढीला भेट दिली. या पेढीद्वारे विक्री करण्यात येणाऱ्या 'एनर्झल' या पेयाच्या लेबलवर 'एनर्जी अँड इलेक्ट्रोलेट ड्रिंक' असे लिहिलेले होते. हे संयुक्त नसल्याने त्यावर कारवाई करण्यात आली.

फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांच्यावतीने २६ मे रोजी छत्रपती संभाजीनगरच्या वळूज येथील एफडीसी लिमिटेड या एनर्झल उत्पादन करणाऱ्या पेढीला पत्र पाठवून एनर्झल हे फ्रुट ड्रिंक ह्यअनब्रँडेडह्व असल्याचे कळविले होते. अशी सूचना देऊनही नागपुरात त्याची विक्री होत सुरू होती. त्यामुळे एफडीएने फ्रुट ड्रिंक एनर्झल, ऑरेंज फ्लेवर, ब्लिट्स फ्लेव्हर, ॲपल फ्लेव्हर, फ्रिमिक्स फॉर वॉटर बेस्ड फ्लेव्हर ड्रिंक, लाइम फ्लेव्हर एनर्जी ड्रिंक आणि इलेक्ट्रोलाइट ड्रिंक असे १० अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले. १ लाख ७९ हजार ६२७ बाटल्या व पाकिटे असा साठा जप्त करण्यात आला, असे एफडीएने सांगितले.

सात लाखांचा औषधसाठा पकडला

विनापरवाना औषध विक्री प्रकरणी धंतोली येथील क्लिनिकवर छापा टाकून सुमारे सात लाखांचा औषधसाठाही जप्त करण्यात आला. धंतोली येथील डायमंड वन इमारतीतील न्यू रूट स्किन, लेझर, हेअर ट्रान्सप्लान्ट क्लिनिक येथून या औषधांची विक्री होत होती. साहाय्यक आयुक्त मनीष चौधरी, अंजली मिटकर, औषध निरीक्षक प्रशांत रामटेके, अभिषेक चवरडोल यांनी ही कारवाई केली. औषधांच्या खरेदीसंदर्भातील कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी खरेदी बिले सादर केली नाहीत. परवाना नसतानाही १६ रेमेडिज नाशिक या परवानाधारक कंपनीच्या नावाने रुग्णांना औषध विक्री बिले देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, असे एफडीएने सांगितले.

भरधाव ट्रकचा नियंत्रण सुटला अन् थेट घुसला घरात



■पालघर। प्रतिनिधी,

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील धानिवरी येथे गुरुवारी सकाळी भरधाव ट्रकने नियंत्रण गमावत थेट एका घरात घुसल्याची घटना घडली. या अपघातात घराच्या भिंतींचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र काही दिवसांपूर्वी याच परिसरात झालेल्या भीषण अपघातात १४ निष्पाप नागरिकांचा बळी गेल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा घडलेल्या या अपघातामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

धानिवरी परिसरातील मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा विकासाचा मार्ग न राहता आता मृत्यूचा सापळा बनला आहे. १४ जणांचा बळी गेल्यानंतरही अपघातप्रवण ठिकाणी मजबूत संरक्षक भिंती उभारण्यात आलेल्या नाहीत. तसेच वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस यंत्रणा उभी करण्यात आलेली नाही. परिणामी भरधाव ट्रक थेट घरात घुसल्याच्या या घटनेमुळे प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या परिसरालगतचा सर्व्हिस रोड शेकडो ग्रामस्थ, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वापरात आहे. त्यामुळे प्रत्येक दिवस हा त्यांच्यासाठी धोकादायक ठरत असून, कोणत्याही क्षणी आणखी एखादी मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. धानिवरी परिसरातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर तातडीने संरक्षक भिंती, वेगमर्यादा नियंत्रण व्यवस्था, चेतावणी फलक आणि अन्य सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा भविष्यात आणखी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

विरारमध्ये जंगलात सुरू असलेल्या हातभट्टीवर पोलिसांची धाड... 2 लाखांचा मुद्देमाल नष्ट

■वसई। प्रतिनिधी,

विरार पूर्व येथील बरफपाडा परिसरातील जंगलात सुरू असलेल्या गावठी दारू निर्मितीच्या अड्डयावर अंमली पदार्थ विरोधी कक्ष-2 च्या पथकाने धाड टाकून हातभट्टी उद्धवस्त केली. या कारवाईत दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवलेले मोठ्या प्रमाणातील वॉश (रसायन) आणि इतर साहित्य नष्ट करण्यात आले असून संबंधित महिलेविरुद्ध विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध दारू निर्मिती व विक्री तसेच अंमली पदार्थांच्या बेकायदा व्यवहारांवर कारवाई करण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार अंमली पदार्थ विरोधी कक्ष-2 चे पथक मंगळवारी गस्त घालत होते. यावेळी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने बरफपाडा परिसरातील जंगलातील ओढ्याजवळ शोधमोहीम राबवली.

तपासादरम्यान तेथे संगिता बाबर हिने गावठी दारू तयार करण्यासाठी विटांची चूल उभारून तब्बल 2,950 लिटर वॉश ड्रममध्ये साठवून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत हातभट्टी उद्धवस्त केली आणि दारू



निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करून नष्ट केले. या कारवाईत एकूण 2 लाख 3 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. याप्रकरणी संबंधित महिलेविरुद्ध विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष-२ च्या पथकाने ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

३ लाखांचे तंबाखूजन्य पदार्थ जप्त

वसई: पश्चिम रेल्वे विभागातील वसई रेल्वे स्थानकात बुधवारी करण्यात आलेल्या कारवाईत मदार जंक्शन झ्र म्हैसूर विशेष ट्रेनच्या दक्षता तपासणीदरम्यान तब्बल ३ लाखांचे तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणी दोन आरोपींना अटकही करण्यात आली आहे. पश्चिम रेल्वेचा अतिदक्षता विभाग, आरपीएफ, जीआरपी आणि वसई रोड रेल्वे स्थानकावरील वाणिज्यिक अधिकार्यांमार्फत बुधवारी मदार जंक्शन झ्र म्हैसूर विशेष ट्रेनची दक्षता तपासणी करण्यात आली. या तपासणी दरम्यान ३.२६ लाख रुपये किमतीचे तंबाखू, पान मसाला, गुटखा उत्पादनांचे जवळपास १८०० पाकिटे जप्त करण्यात आली असल्याची माहिती पश्चिम रेल्वेकडून देण्यात आली आहे.या प्रतिबंधित वस्तूंच्या अवैध वाहतुकीत सामील असलेल्या दोन व्यक्तींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि रेल्वे नेटवर्कमध्ये चालणार्या अशा बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्यासाठी भारतीय रेल्वे कटिबद्ध असून, भविष्यातही अशा कारवाया तीव्र केल्या जातील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

नागपुरातील दर्ग्यात महिलेच्या जबरदस्ती धर्मांतराचा प्रयत्न... नकार देताच विचित्र प्रकार, ६ जणांविरोधात गुन्हा दाखल



■नागपूर । प्रतिनिधी,

नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील जुनी कामठी परिसरातील मरियम अम्मा दर्ग्यात एका हिंदू महिलेचे जबरदस्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी कोलकाता येथील पीडित महिलेच्या तक्रारीवरून कन्हान पोलिसांनी दग्यार्शी संबंधित सहा जणांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून त्यापैकी तिघांना अटक करण्यात आली आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नागपूर ग्रामीण पोलिसांनी विशेष तपास पथक स्थापन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम बंगालमधील कोलकात्याच्या डमडम परिसरात राहणारी ही महिला एप्रिल महिन्यात मरियम अम्मा दर्ग्यात आयोजित करण्यात आलेल्या उर्स कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नागपूरला आली होती. मागील तीन ते चार वर्षांपासून ती नियमितपणे उर्सच्या कार्यक्रमासाठी येथे येत असल्याचे सांगितले जाते. मात्र यंदाच्या भेटीदरम्यान दग्यार्तील काही व्यक्तींनी तिच्यावर धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा आरोप तिने आपल्या तक्रारीत केला आहे.

महिलेच्या म्हणण्यानुसार, 18 ते 19 एप्रिल दरम्यान तिला दर्गा परिसरात डांबून ठेवण्यात आले. धर्मांतरास नकार दिल्यानंतर तिच्याशी गैरवर्तन करण्यात आले, मारहाण करण्यात आली तसेच जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. याशिवाय तिच्या हत्येचाही प्रयत्न करण्यात आल्याचा गंभीर आरोप तिने केला आहे. कशीतरी स्वतःची सुटका करून घेतल्यानंतर ती कोलकाता येथे परतली. तेथे वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर तिने स्थानिक पोलिस ठाण्यात झीरो तक्रार दाखल केली. घटना नागपूर जिल्ह्यातील कन्हान पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्यामुळे डमडम पोलिसांनी झिरो एफआयआरद्वारे प्रकरण कन्हान पोलिसांकडे वर्ग केले. त्यानंतर नागपूर ग्रामीण पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला.

या प्रकरणात ताजी तनविरुद्दीन कलीमउद्दीन (52), ताजी मुस्ताफिजुद्दीन तनविरुद्दीन (24) आणि तेजस आनंद खोब्रागडे (24) यांना 29 मे रोजी अटक करण्यात आली आहे. उर्वरित तीन आरोपींपैकी दोन महिला आणि एक वयोवृद्ध व्यक्ती असल्याची माहिती पोलिसांनी दिली असून त्यांचा शोध सुरू आहे.


नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी सांगितले की, महिलेच्या तक्रारीनुसार मारहाण, धर्मांतरासाठी दबाव आणि हत्येच्या प्रयत्नाचे आरोप नोंदविण्यात आले आहेत. प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने एसआयटीमार्फत तांत्रिक आणि अन्य सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. काही इलेक्ट्रॉनिक उपकरणेही जप्त करण्यात आली असून या प्रकरणात आणखी काही धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच अशा प्रकारचा दबाव किंवा अत्याचार झाल्यास नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

सौदेबाजीचा गाढवबाजार!



महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणूक पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. मात्र ही चर्चा लोकशाही, विचारधारा, जनहित किंवा नेतृत्वाच्या गुणवत्तेभोवती फिरताना दिसत नाही. उलट, या निवडणुकीचा संपूर्ण पट हा अर्थ, स्वार्थ, सौदेबाजी आणि राजकीय व्यवहार यांच्या धाग्यांनी विणलेला असल्याचे चित्र समोर येत आहे. लोकशाहीच्या मंदिरात ज्या प्रक्रियेतून समाजातील सक्षम, अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींना संधी मिळायला हवी होती, त्याच प्रक्रियेत आज पैशाच्या बळावर उमेदवारी विकत घेण्याची आणि मतांची खरेदी-विक्री करण्याची स्पर्धा सुरू असल्याचे दिसून येते. विधान परिषद ही भारतीय लोकशाही व्यवस्थेतील एक महत्त्वाची संस्था आहे. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींमार्फत होणाया निवडणुकांचा उद्देश हा स्थानिक पातळीवर काम करणाया अनुभवी लोकप्रतिनिधींना राज्याच्या धोरणनिर्मितीत स्थान मिळवून देणे हा होता. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महापालिकांमधून जनतेच्या प्रश्नांशी थेट संबंध आलेल्या व्यक्तींना राज्याच्या विधिमंडळात प्रवेश मिळावा, हा त्यामागील उदात्त हेतू होता. परंतु आज हा हेतू कोठेतरी हरवून गेला आहे. वास्तविक पाहता, विधान परिषद ही अशा व्यक्तींसाठी असायला हवी होती ज्यांच्यात नेतृत्वाचे गुण आहेत, ज्यांना समाजकारणाची जाण आहे, जे अभ्यासू आहेत; परंतु जातीय समीकरणे, मतदारसंघातील आर्थिक मयार्दा किंवा स्थानिक राजकीय गणितांमुळे त्यांना थेट विधानसभा निवडणुका जिंकणे शक्य होत नाही, अशा लोकांना सार्वजनिक जीवनात योगदान देण्याची संधी देण्यासाठी ही व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. पण आज परिस्थिती इतकी विकृत झाली आहे की उमेदवारीची पहिली अट नेतृत्व नसून आर्थिक ताकद बनली आहे. अलीकडील निवडणूक प्रक्रियेकडे पाहिले तर एक गोष्ट प्रकषार्ने जाणवते ज्याच्याकडे पैसा, त्याच्याकडे संधी. पक्षनिष्ठा, दीर्घकाळ केलेले संघटनात्मक काम, जनाधार किंवा वैचारिक बांधिलकी यांचे मूल्य झपाट्याने कमी होत चालले आहे. अनेक पक्षांमध्ये वषार्नुवर्षे झिजणारे, पक्षासाठी संघर्ष करणारे आणि संकटातही ध्वज खांद्यावर घेऊन उभे राहणारे कार्यकर्ते आज उपेक्षित होताना दिसत आहेत. कारण त्यांच्याकडे कोट्यवधींची रसद नसते. त्यांच्याकडे मतदारांना किंवा निर्णयकर्त्यांना प्रभावित करण्याइतकी आर्थिक क्षमता नसते. परिणामी, विधान परिषदेच्या निवडणुका या विचारांच्या नव्हे तर व्यवहारांच्या निवडणुका बनल्या आहेत. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा राजकीय रंग या निवडणुकीला देण्याचा प्रयत्न होत असला तरी प्रत्यक्षात पडद्यामागे वेगळेच समीकरण काम करत असते. कोणाचा उमेदवार अधिक श्रीमंत आहे, कोणाकडे किती संसाधने आहेत, कोण किती प्रभाव टाकू शकतो आणि कोण किती किंमत मोजू शकतो यावरच निवडणुकीचे गणित उभे राहताना दिसते. यंदाच्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते माघारी घेण्यापर्यंत अनेक चर्चा रंगल्या. उमेदवारीसाठी रसद आणि माघारीसाठीही रसद, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले गेले. अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवसापर्यंत सुरू असलेली हालचाल ही लोकशाही प्रक्रियेपेक्षा एखाद्या शेअर बाजारातील व्यवहारांची आठवण करून देणारी होती. कोण उमेदवारी कायम ठेवणार, कोण माघार घेणार आणि त्यासाठी कोणत्या अटी ठरणार याबाबत सुरू असलेल्या चर्चांनी लोकशाहीच्या प्रतिष्ठेलाच धक्का दिला. ह्यखोकेह्ण आणि ह्यपेट्याह्ण या सांकेतिक शब्दांनी राज्याच्या राजकारणात एक वेगळाच शब्दकोश निर्माण केला आहे. विरोधक एकमेकांवर आरोप करतात, सौद्यांचे आकडे सांगतात, बंडखोरांना शांत करण्यासाठी किती खोके लागले यावर सार्वजनिक चर्चा होते. ही बाब लोकशाही व्यवस्थेच्या अधःपतनाची साक्ष देणारी आहे. जे व्यवहार पूर्वी बंद दाराआड होत असतील, त्यांच्याविषयी आज उघडपणे बोलले जाते. समाजालाही आता या प्रक्रियेचे आश्चर्य वाटेनासे झाले आहे. हीच सर्वात चिंताजनक बाब आहे. लोकशाहीची खरी ताकद ही मतदारांच्या विश्वासात असते. परंतु जेव्हा मतांची किंमत पैशात मोजली जाते, तेव्हा त्या विश्वासाची पायाभरणीच हादरते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेले प्रतिनिधी हे आपल्या मतदारांचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचे मत हे जनतेच्या अपेक्षांचे प्रतीक असते. पण जर त्याच मताचे रूपांतर खरेदी-विक्रीच्या वस्तूमध्ये झाले, तर त्यामागे उभ्या असलेल्या लाखो नागरिकांच्या मतांचाही अवमान होतो. दुदैर्वाची बाब म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेत पक्षप्रमुखांची भूमिकाही प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. घोडेबाजाराला आळा घालण्याऐवजी अनेकदा त्यालाच अप्रत्यक्ष चालना दिली जात असल्याची भावना निर्माण होते. पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना न्याय देण्याऐवजी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींना प्राधान्य दिले जाते. परिणामी पक्षसंघटनेमध्ये निराशा वाढते. वषार्नुवर्षे मेहनत घेणाया कार्यकर्त्यांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की पक्षासाठी संघर्ष करण्याचे नेमके फळ काय? अशा परिस्थितीत राजकारणात येर्णाया नव्या पिढीसमोरही चुकीचा संदेश जातो. आज गरज आहे ती या संपूर्ण व्यवस्थेच्या पुनर्विचाराची. स्थानिक स्वराज्य प्राधिकरण मतदारसंघांच्या निवडणुकांमध्ये अधिक पारदर्शकता आणण्याची आवश्यकता आहे. उमेदवार निवड प्रक्रियेत आर्थिक क्षमता नव्हे तर सार्वजनिक योगदान, नेतृत्वगुण, अभ्यास आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य दिले पाहिजे. पक्षांनी आपल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच निवडणूक प्रक्रियेत पैशाच्या प्रभावावर कठोर नियंत्रण आणणे ही काळाची गरज आहे. अन्यथा उद्या विधान परिषद ही लोकशाहीतील गुणवंत नेतृत्वासाठी खुला दरवाजा न राहता, पैशांच्या ताकदीवर उघडणारे एक खास प्रवेशद्वार बनून राहील. तो दिवस भारतीय लोकशाहीसाठी निश्चितच चिंतेचा असेल. ज्याच्याकडे अधिक पैसा त्याला संधी मिळते, सत्ता मिळाली की, त्यातून अधिक पैसा मिळवायचा. या सौदेबाजीला आजवर घोडेबाजार म्हटले जात असे, पण आता याला गाढवबाजार म्हणावे लागेल. कारण लोकांना गाढव समजून हा बाजार केला जात आहे.

बनावट बहिणींनी केले सरकारचे वांदे

कवयित्री इंदिरा संत यांची एक कविता आहे. 'लाडकी बाहुली होती माझी एक, मिळणार तशी ना शोधूनी दुसऱ्या लाख'. या कवितेचे महत्त्व कुणाला कळले नसले तरी महायुती सरकारला चांगलेच कळले आहे. मध्य प्रदेशमधील 'लाडली बहेना' महाराष्ट्रात 'लाडकी बहीण' नावाने जुलै 2024 पासून नावारूपाला आली आहे. पण यातील अपात्र महिलांकडून पैस परत घेणार नाही, असे वक्तव्य मुख्यमंत्र्यांनी केल्यामुळे सरकारी तिजोरीवरील आर्थिक भाराचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. वास्तविक का खूप गंभीर प्रश्न आहे. मात्र, सरकार याबाबत खूप लवचिक धोरण स्वीकारत आहे. कदाचित त्यांना मतांची चिंता सतावत असावी.

मे 2024 मधील लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या महायुतीचे 48 पैकी 17 जागांवर उमेदवार विजयी झाले तर शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (पवार गट) आणि काँग्रेस यांच्या महाविकास आघाडीला 30 जागांवर विजय मिळाला होता. या धक्क्यातून सावरण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना जुलै 2024 पासून राबवायला सुरूवात केली. या योजनेचे मतदानरुपी फळ नोव्हेंबर 2024 च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पारड्यात पडले. त्यामुळे ही योजना महायुतीच्या अस्तित्वाची योजना बनली आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात लाडक्या बहिणींसाठी तब्बल 26 हजार 500 कोटींची तरतूद केली आहे. लाडकी बहीण योजना 2024 पासून कायम चर्चेत राहिली आहे. या योजनेसाठी इतर विकासकामांचा, योजनांचा निधी वळवल्याचा आरोप खुद्द सरकारमधील मंत्र्यांनीच केला होता. तर राज्याचे दिवाळे वाजेल आणि सरकारला योजना बंद करावी लागेल, असे तेव्हापासून विरोधक बोलत होते. त्यावेळी प्रत्येकवेळी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे मुख्यमंत्र्यासह सरकारमधील सर्व मंत्री, आमदार, नेते प्रत्येक भाषणात सांगत होते. अशी ही चर्चेत असलेली लाडकी बहीण योजना पुन्हा चर्चेत येण्याचे कारण म्हणजे अपात्र महिलांना तब्बल 24 हजार कोटी वाटल्याचा झालेला गंभीर आरोप. योजना सुरू झाली तेव्हा पहिल्या ऑगस्ट 2024 मध्ये एकूण 2 कोटी 47 लाख महिलांना प्रत्येकी 1500 रुपयांचे मानधन देण्यात आले. तर दोन दिवसांपूर्वी लाडकी बहीण योजनेतील अधिकृत आकडा 1 कोटी 67 लाख झाला आहे. म्हणजेच तब्बल 80 लाख महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्या आहेत. याचा अर्थ 80 लाख महिलांना राज्य सरकारकडून प्रत्येकी दीड हजार रुपये 2२ महिने देण्यात आले. हे हजारो कोटी रुपये म्हणजे सरकारी तिजोरीवर एकप्रकारे डल्लाच म्हणावा लागेल.

लाडकी बहीण योजनेच्या निकषात बसत नसतानाही या 80 लाख बहिणींना जनतेच्या करातून जमा झालेले सरकारी पैसे खिरापतीप्रमाणे देण्यात आले. मुळात अर्ज आले आणि त्यांची कोणतीही तपासणी न करता सरसकट त्यांना मानधन



देण्यात आले. गंभीर बाब म्हणजे यात तब्बल 14 हजार पुरुषांचाही समावेश आहे. शिवाय सरकारी नोकरीत असर्णाया महिलांचाही समावेश आहे. यातील केवळ 14 हजार पुरुषांकडून पैसे वसूल केले जातील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. वास्तविक सरकारी योजनेचा गैरफायदा घेर्णाया सर्वांवर आधी गुन्हे दाखल व्हायला हवेत आणि त्यांच्याकडून व्याजासकट सर्व रक्कम वसूल करायला हवी. मात्र, 2029 मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ईव्हीएममधून नाराजी उमटली तर काय, या भीतीने सरकारी तिजोरीवर डल्ला मारर्णायांबाबत कठोर पाऊले उचलताना दिसत नाही.

खरेतर एवढा मोठा आर्थिक लाभ देताना त्यांची फूलप्रुफ तपासणी होणे गरजेचे होते. मात्र, विधानसभेची 2024 मधील निवडणूक तोंडावर असल्यामुळे सरकारला असे काही करायचे नव्हते. त्यामुळे लाडकी बहीण योजना सरकारवर बोजा ठरली आहे. वास्तविक योजनेचे निकष ठरल्यानंतर आलेल्या सर्व अर्जांची छाननी व्हायला हवी होती. तसे झाले असते तर आज अपात्र ठरलेल्या 80 लाख महिला आणि 14 हजार पुरुष त्याचवेळी अपात्र ठरले असते आणि पैसा सरकारच्या तिजोरीतच राहिला असता. आता सरकार केवळ 14 हजार पुरुषांकडून पैसे वसूल करणार म्हणत असले तरी ते कशापद्धतीने करणार, त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार का, याबाबत सरकारकडून काहीही स्पष्टता नाही. आणखी एक गंभीर बाब म्हणजे लाभार्थ्यांमधील तब्बल 5 लाख सरकारी कर्मचारी आहेत. हे म्हणजे कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार आहे. कुठल्याही निकषात बसत नसतानाही आणि हजारो-लाखो रुपये पगार घेर्णाया सरकारी कर्मचार्यांनी दीड हजार रुपयांच्या हव्यासापोटी सरकारची फसवणूक करणे, हा गुन्हा आहे. त्यांच्यावर सरकारने कारवाई करणे अपेक्षित आहेच शिवाय त्यांच्याकडूनही मानधनाची रक्कम व्याजासह वसूल करायला हवी. योजना चांगली असली तरी ती कोणत्या हेतूने राबवत आहोत, याचे भान सरकारने राखले नाही. त्यामुळे लाडकी बहीण योजना केवळ मतदानाची योजना म्हणूनच जास्त चर्चेत राहिली, हे महायुती सरकारचे अपयश म्हणावे लागेल.

अपात्री ओवाळणी

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये विरोधकांना मिळालेले यश पाहून, महायुतीच्या सरकारने घाईघाईने राज्यात महिलांना दीड हजार रुपयांचे वाटप सुरू केले. त्यासाठी विविध निकष होते, मात्र निवडणुकीपूर्वी ते सर्रास धाब्यावर बसवले गेल्याचे आता स्पष्ट होते.

राज्य सरकारच्या ह्यलाडकी बहीणह्ण योजनेतील तब्बल ८० लाख लाभार्थी अपात्र ठरल्यामुळे त्यांना राज्य सरकारकडून दरमहाची दीड हजार रुपयांची ओवाळणी बंद होणार आहे; परंतु सुरुवातीपासूनच या योजनेत खातरजमा न करता सरसकट पैसेवाटपाची घाई आणि आता तिजोरीवर आलेला ताण पाहता कधी ना कधी ही वेळ येणारच होती.

योजनेच्या प्रारंभी लाभार्थींची संख्या जवळपास अडीच कोटींपर्यंत गेली होती. अन्य योजनांचा लाभ घेणाऱ्या किंवा घरी चारचाकी वाहन असलेल्या म्हणजेच सधन कुटुंबातील महिलांनीही याचे लाभ घेतले. काही सरकारी कर्मचारी वा निवृत्ती वेतनधारकांनीही यातून पैसा काढला आहे; इतकेच नव्हे तर बहिर्णींचे पदर ओढून काही भाऊसुद्धा या महिला लाभार्थींच्या यादीत शिरल्याची धक्कादायक बाबही आता उघड झाली आहे! आता हे सर्व जण अपात्र ठरून, त्यांच्याकडून पैसेही वसूल करण्यात येणार आहेत. ही अशी वसुली व्हावीच; पण अपात्रांना लाभ देताना कोणतीही पडताळणी-खातरजमा न करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कडक कारवाई झाली पाहिजे.

कदाचित निवडणुकीपूर्वी 'फार कडक पडताळणी करू नये,' अशा 'तोंडी सूचना'ही त्यांना दिलेल्या असू शकतात. खरे तर योजनेतील गैरप्रकारांचा मुद्दा विरोधकांनीही लावून धरायला हवा; पण गेल्या काही काळात राज्यात सत्ताधारी कोण आणि विरोधक कोण, हेच समजेनासे झाले आहे. त्यातच लाभार्थी बहिणींची खप्पामर्जी नको, म्हणूनही त्यांच्या विरोधाची धार बोथट होत असावी. या छाननीनंतर दरमहा बाराशे कोटी रुपयांची बचत होईल, अशी सरकार पाठ थोपटून घेईल; पण काही हजार कोटी आजवर अपात्रांना दिले, याची जबाबदारी कोण घेणार? मुळात अशा रेवडी योजना सरकारी तिजोरीसाठी अनर्थकारी ठरत असून, त्या राबवणारी बहुसंख्य राज्ये कर्जाच्या खाईत गेली आहेत.

सर्वोच्च न्यायालय आणि आर्थिक पाहणी अहवालातही त्यावरून सरकारांचे कान टोचण्यात आले आहेत; तसेच या योजनेवर होणाऱ्या जवळपास ३६ हजार कोटी रुपयांच्या खर्चामुळे अन्य विभागांच्या विकासकामांनाही कात्री लागली आहे. मात्र लोकानुनयाची धुंदी आणि दीर्घकालीन विकासाची विस्मृती झालेल्यांना समजावणार तरी कोण?

रिंग रोड प्रकल्पग्रस्तांना न्याय केव्हा?



नाशिकच्या रिंग रोड प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत असून पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा आरोपही चर्चेत आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना न्याय कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. वाहतूक सुधारण्यासाठी महत्त्वाचा मानला जाणारा हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या हक्कांवर परिणाम करू नये, अशी त्यांची मागणी आहे. तसेच, उच्च न्यायालयात सादर केलेल्या चारही अलाइनमेंटची अधिकृत माहिती आधी शेतकऱ्यांना देण्याची ठाम मागणी करण्यात आली.

रिंग रोड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी गेल्या काही दिवसांपासून त्यांचा संघर्ष सुरू आहे. मंत्र्यांच्या निवासस्थानी आंदोलन करण्याबरोबरच जिल्हा प्रशासनासोबत बैठकींचे सत्रही सुरू आहे. दरम्यान, आंदोलनादरम्यान पोलिसांनी बाधित शेतकऱ्यांवर लाठीचार्ज केल्याचा आरोपही चचेर्चा विषय ठरला आहे. या सर्व घडामोडींमुळे रिंग रोड प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय नेमका केव्हा मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. नाशिकच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेसाठी रिंग रोड प्रकल्प महत्त्वाचा मानला जात असला, तरी या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा येऊ नये, अशी अपेक्षा शेतकरी आणि त्यांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली. उच्च न्यायालयात शासनाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या रिंग रोड प्रकल्पाच्या चारही अलाइनमेंटची संपूर्ण व अधिकृत माहिती सर्वप्रथम बाधित शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावी, अशी ठाम मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. याशिवाय, हरकती नोंदविण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना एकमेकांविरोधात उभे करण्याचे प्रकार काही अधिकारी करत असल्याचा आरोप करण्यात आला. असे प्रकार तत्काळ थांबवावेत, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. दरम्यान, बाधित शेतकऱ्यांनी आपला मोर्चा मंत्री छगन भुजबळ आणि नरहरी झिरवाळ यांच्या निवासस्थानांवर नेला. आंदोलनाच्या वेळी मंत्री भुजबळ अनुपस्थित होते, तर मंत्री झिरवाळ यांनी या विषयावर मुख्यमंत्र्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघाच्या आमदार प्रा. देवयानी फरांदे आणि आमदार हिरामण खोसकर यांच्या मध्यस्थीने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासोबत शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाची सविस्तर बैठक पार पडली. या बैठकीत रिंग रोड प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध समस्या, जमिनींचे मूल्यांकन, मोबदला तसेच प्रकल्पाच्या अलाइनमेंटबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या वेळी एमएसआयडीसी आणि महसूल विभागातील काही अधिकारी चुकीची माहिती देऊन जिल्हाधिकाऱ्यांची दिशाभूल करीत असल्याचा गंभीर आरोप शेतकरी प्रतिनिधींनी केला. तसेच रिंग रोड प्रकल्पासंदर्भात उच्च न्यायालयात सरकारच्या वतीने चार वेगवेगळ्या अलाइनमेंट सादर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र या अलाइनमेंटबाबतची अधिकृत माहिती, नकाशे, प्रभावित क्षेत्रे, बाधित गावांची यादी तसेच संभाव्य जमीन संपादनाचा तपशील अद्याप शेतकऱ्यांसमोर स्पष्टपणे मांडण्यात आलेला नाही. त्यामुळे कोणत्या गावांवर किती परिणाम होणार, किती जमीन संपादित केली जाणार आणि मोबदल्याचे निकष काय असतील, याबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. शेतकरी प्रतिनिधींनी प्रशासनाकडे अशी मागणी केली, की चारही पर्यायांची सविस्तर माहिती सार्वजनिक करून ग्रामस्तरावर चर्चा आयोजित करण्यात यावी. त्यानंतरच पुढील निर्णय प्रक्रिया राबवावी. पारदर्शकता राखल्यास वाद कमी होतील आणि प्रकल्पाबाबतचा विश्वास वाढेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. बैठकीत माडसांगवी गावातून जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. संबंधित महामागार्चा अधिकृत नकाशामध्ये समावेश नसल्यामुळे परिसरातील अनेक शेतजमिनींच्या मूल्यांकनात अडचणी निर्माण झाल्या असून जमीनधारकांना योग्य मोबदला मिळत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी संबंधित बाबींची तातडीने पडताळणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याचे आदेश दिले. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.


पाथर्डी, वडनेर दुमाला, गौळाणे, विहितगाव, पिंपळगाव बहुला, माडसांगवी ते विंचूर गवळी या परिसरातील जमिनींच्या मूल्यांकन प्रक्रियेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. अनेक शेतकऱ्यांनी बाजारभाव आणि शासनाने निश्चित केलेल्या दरांमध्ये मोठी तफावत असल्याची बाब मांडली. यावर जमिनींच्या मूल्यांकन व मोजणी प्रक्रियेचा फेरआढावा घेण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. प्रशासनाने वस्तुनिष्ठ पद्धतीने पुनर्मूल्यांकन केल्यास अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी दूर होऊ शकतात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी बैठकीत स्पष्ट केले की, विकासकामांना शेतकऱ्यांचा विरोध नाही. शहराच्या आणि परिसराच्या विकासासाठी रिंग रोडसारखे प्रकल्प आवश्यक आहेत. मात्र, विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, त्यांच्या जमिनींचे योग्य मूल्यांकन व्हावे आणि त्यांना न्याय्य मोबदला मिळावा, हीच त्यांची प्रमुख अपेक्षा आहे. याच भूमिकेला पाठिंबा देत आमदार हिरामण खोसकर यांनीही शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्याची गरज अधोरेखित केली. बैठकीत प्रशासनाने शेतकऱ्यांच्या जमिनींना योग्य व न्याय्य मोबदला देण्यासाठी विशेष प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे हा प्रस्ताव सादर करण्याबाबतही चर्चा झाली. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी एकत्रितपणे पाठपुरावा करतील, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली. बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाने संवेदनशीलतेने निर्णय घ्यावा आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी अपेक्षा बैठकीनंतर व्यक्त करण्यात आली. आता प्रशासन काय निर्णय घेते, याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे.

बंडखोरांना महायुतीने गुंडाळले!

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषदेच्या निवडणुकांमध्ये विजय मिळवण्यासाठी महायुतीने बंडखोरी रोखण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. इच्छुकांची समजूत काढत साम, दाम, दंड, भेद, राजकीय डावपेचांचा वापर करत, विशेषतः मराठवाड्यातील चार जागांवर संभाव्य बंडखोरीचे सावट असताना, विविध राजकीय समन्वय आणि आश्वासनांच्या जोरावर महायुतीने बहुतांश ठिकाणी अंतर्गत संघर्ष आटोक्यात आणला.



स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील जागांवर विजय मिळवण्यासाठी महायुतीने बंडखोरी रोखण्यावर विशेष भर दिला. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद या सर्व राजकीय डावपेचांचा अवलंब करण्यात आला. राज्यातील १७ जागांपैकी चार जागा मराठवाड्यातील असून, या ठिकाणी काही बंडखोर उमेदवारांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांसमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला. मात्र विविध राजकीय समन्वय आणि आश्वासनांच्या माध्यमातून या बंडखोरांना शांत करण्यात महायुतीला बऱ्याच प्रमाणात यश आले. विधान परिषद सदस्यांच्या रखडलेल्या निवडणुका कधी जाहीर होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. निवडणुकीची घोषणा होताच अनेक इच्छुकांनी उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू केले. महायुतीच्या बहुतांश जागांवर त्यांच्या घटक पक्षांतील किंवा मित्रपक्षांतील इच्छुकांनीच बंडखोरी केल्याने नेतृत्वाची चिंता वाढली होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मराठवाड्यातील जागांबाबत संयुक्त बैठक घेऊन जागावाटपाचा अंतिम निर्णय घेतला. त्यानंतर महायुतीच्या मतदारांना अधिकृत उमेदवारांनाच मतदान करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तिन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी वारंवार निर्देश दिल्यानंतरही काही ठिकाणी बंडखोरी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. अखेरीस नाराज इच्छुकांना विविध महामंडळांवरील पदांची आश्वासने देऊन त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरीही काही भागांत विरोधकांना मतदार आपल्या बाजूने वळविण्यात यश मिळाल्याचे दिसून आले. महायुतीने नांदेड मतदारसंघातून अमरनाथ राजुरकर, धाराशिव-लातूर-बीड येथे बसवराज माधवराव पाटील, छत्रपती संभाजीनगर - जालना येथून सुहास त्र्यंबकराव शिरसाट, तर परभणी - हिंगोली येथून सईद शेरगुल खान यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपने विधान परिषदेसाठी मराठवाड्यात काँग्रेसमधून आलेल्या नेत्यांना उमेदवारी दिल्याने पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अनेक वर्षे पक्षासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून नव्याने आलेल्या चेहऱ्यांना संधी दिल्याची चर्चा सुरू आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या अपेक्षांना धक्का बसल्याची भावना व्यक्त होत असून, या निर्णयाबाबत पक्षांतर्गत असंतोष दिसून येत आहे. मराठवाड्यात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण व राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्यातील जुने राजकीय वैर सर्वश्रुत आहे. मात्र महायुतीच्या राजकारणात हे दोन्ही नेते एकत्र आल्याने नांदेडच्या राजकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आले. काही दिवसांपूर्वी एकमेकांवर टीका करणारे हे नेते निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नेत्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी पालकमंत्री संजय शिरसाट तसेच भाजपकडून होत असलेल्या अडचणींबाबत नाराजी व्यक्त केली. बैठकीदरम्यान सत्तार आणि शिरसाट यांच्यात वादही झाल्याची चर्चा आहे. यापूर्वी भाजपवर कठोर टीका करणारे अब्दुल सत्तार यांनी पक्षातील परिस्थितीवर नाराजी व्यक्त केली होती. मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी झालेल्या चचेर्नंतर त्यांनी आपली भूमिका मवाळ केली. मराठवाड्यातील सर्वात मोठा जिल्हा असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनेक मतदारसंघांतील प्रश्न तसेच पक्षाची संघटनात्मक ताकद व विविध विकासनिधी याबाबतचा आढावा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतला. शिवसेनेला अधिक ताकद देण्याच्या दृष्टीने भाजपच्या तक्रारीवरही मुख्यमंत्र्यांशी बोलण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतर छत्रपती संभाजीनगरमधील बंडोबांना थंड करण्यात पक्षाला यश आले. परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील बंडखोरांनी माघार घ्यावी यासाठी पडद्यामागे बऱ्याच हालचाली झाल्या. राष्ट्रवादीच्या बंडखोरांवर वरिष्ठ पातळीवरून दबाव आणल्यामुळे या ठिकाणी वातावरण निवळले. महाविकास आघाडीचे डॉ. विवेक नावंदर आणि महायुतीचे सईद खान यांनी प्रचाराला वेग दिला आहे. परभणीत बंडखोर विजय जामकर यांच्यावर माघारीसाठी दबाव टाकण्यात आला, तर काँग्रेसचे सुशील देशमुख यांनी निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. सुरुवातीला महायुतीने बंडखोरांना गांभीयार्ने घेतले नाही; मात्र स्थानिक राजकीय समीकरणांमुळे परिस्थिती अनिश्चित राहिली आहे. धाराशिव-लातूर-बीड विधान परिषद मतदारसंघात नऊ उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून सात अपक्षांचे अर्ज वैध ठरले. यापैकी काही अपक्ष महाविकास आघाडीशी संबंधित मानले जातात. अखेरच्या टप्प्यात अनेक अपक्ष माघार घेतील, असा अंदाज आहे. मराठवाड्यातील चारही जागा महायुतीने प्रतिष्ठेच्या केल्या असून बंडखोरांना शांत करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद दिसून आले असले, तरी विजय हेच अंतिम लक्ष्य असल्याने बंडखोरांना आटोक्यात आणण्यात महायुतीला यश मिळाल्याचे चित्र सध्या दिसत आहे.



छोले सॅलड

साहित्य : २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

कृती: एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वचेच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वचेच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्सची समस्या!



चेहऱ्यावरचे डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे' !

फायदेशीर उपाय – धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेहऱ्याला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणाऱ्या बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये 86.3% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेहऱ्यावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.



साहित्य-
■ दोन चमचे धणे ■ चमचाभर हळद ■ ग्लासभर पाणी

कसे बनवाल मिश्रण

■ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ■ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ■ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ■ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

म्हातारपणात मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

हृदयरोग

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

कर्करोग

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

स्ट्रोक

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.

■ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ■ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ■ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.



स्मार्टफोनला कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.

स्क्रीन का तुटते ?

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे ?

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.



सर्व काही आरोग्यासाठी

स्त्रीचे आरोग्य म्हणजे फक्त गर्भारपण व बाळंतपणाच्या वेळचे आरोग्य नव्हे. खरे म्हणजे त्या वेळचे आरोग्य जर सर्व दृष्टीने सुदृढ राखावयाचे असेल तर त्याची काळजी तिच्या जन्मापासूनच घेतली पाहिजे. सुदृढ स्त्रीच सुदृढ आणि कार्यक्षम माता होऊ शकते. म्हणूनच स्त्रीच्या आरोग्याची काळजी व त्यासाठी लागणाऱ्या सुविधा तिला जन्मापासून मिळाल्या पाहिजेत. आयुष्याच्या सर्व टप्प्यांत सुदृढ असलेली स्त्री स्वतः तर स्वावलंबी बनेलच, पण समाजविकासाच्या कार्यालाही हातभार लावील. म्हणून सर्वांनी एकत्र येऊन स्त्रियांना स्वतंत्र, सुदृढ व संपूर्ण जीवन जगण्यास शिकवले पाहिजे. केवळ होणाऱ्या अन्यायासाठी एकत्र न येता आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठीसुद्धा स्त्रियांनी एकत्र यायला हवे.



ॲक्ने, ब्लॅकहेडचा त्रास दूर करण्यासाठी कसा कराल मुलतानी मातीचा वापर

त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी पूर्वीपासून मुलतानी मातीचा वापर केला जातो. या आयुर्वेदिक उपायामुळे ॲक्ने, कळवंडलेली त्वचा, सनटॅन कमी करण्यास मदत होते. मात्र आजकाल कॉस्मेटिक क्रीम्स आणि उपाचारांचा वापर अधिक केला जातो. मात्र त्याचा काही दुष्परिणाम त्वचेवर होऊ शकतो. म्हणूनच हा धोका टाळण्यासाठी मुलतानी माती हा सुरक्षित आणि नैसर्गिक उपाय वापरणे अधिक फायदेशीर आहे.



कशी ठरते मुलतानी माती फायदेशीर?

■ मुलतानी मातीमध्ये मॅग्नेशियम क्लोराईडचे प्रमाण आढळते. यामुळे ॲक्नेचा त्रास कमी होण्यास मदत होते.

■ तेलकट त्वचेवर मुलतानी मातीचा वापर केल्यास अतिरिक्त तेल आणि त्वचेचा तेलकटपणा कमी होतो. तसेच पुन्हा पिंपल येण्याचे प्रमाण कमी होते.

■ चेहऱ्यावर मुलतानी मातीचा फेसपॅक लावल्याने त्वचेवरील मळ कमी होतो. तसेच तेल आणि मृतपेशींचा थर कमी होतो.

■ मुलतानी मातीमुळे त्वचेवर थंडावा निर्माण होतो. त्यामुळे डाग, लालसरपणा कमी होतो.

■ उन्हात फिरल्याने होणारे सनटॅन, पिंगमेंटेशनचा त्रास कमी होण्यास मदत होते.

■ व्हाईटहेड्स, ब्लॅकहेड्सचा त्रास कमी होण्यासाठी मुलतानी माती फायदेशीर ठरते.

■ चांगल्या आयुर्वेदिक भंडार / दुकानामधून घेतलेल्या मुलतानी मातीचा त्वचेवर मुळीच दुष्परिणाम होत नाही.

त्वचेच्या प्रकार ओळखून त्यानुसार कसे कराल मुलतानी मातीचे फेसपॅक

तेलकट त्वचेसाठी

तुमची त्वचा तेलकट असल्यास योग्य फेसवॉशची निवड करून चेहरा नियमित धुवा. तसेच मुलतानी मातीचा फेसपॅक बनवताना त्यामध्ये गुलाबपाणी आणि चिमूटभर हळद मिसळा. हा पॅक चेहऱ्यावर आणि मानेवर पातळ थराच्या उंचीचा लावा. हा नैसर्गिकरीत्या सुकू द्या. त्यानंतर पाण्याने स्वच्छ धुवा. हा पॅक लावल्यानंतर चेहऱ्याची फार हालचाल करू नका. बोलू नका.

सामान्य त्वचेसाठी

■ सामान्य त्वचेवर मुलतानी मातीचा वापर करताना मुलतानी मातीची पेस्ट गुलाबपाण्याऐवजी दुधात बनवावी.

■ ॲक्नेचा त्रास कमी करण्यासाठी मुलतानी मातीचा वापर करत असल्यास मुलतानी मातीसोबत कडुलिंब, कापूर आणि गुलाबपाण्याचा वापर करा. हा पॅक चेहऱ्यावर आठवड्यातून एकदा लावावा.

■ पिंपल्सचे डाग, खुणा कमी करण्यासाठी मुलतानी माती वापरत असल्यास त्यामध्ये टोमॅटोचा रस मिसळा. सोबतच चंदन, हळदीचा या फेसपॅकमध्ये समावेश करू शकता.

■ चेहऱ्यावर काळे डाग असल्यास मुलतानी मातीमध्ये दही, पुदिन्याची पानं याची पेस्ट मिसळून तयार पॅक चेहऱ्यावर डाग असलेल्या जागी लावावा. अर्धा तासानंतर हा पॅक कोमट पाण्याने स्वच्छ धुवावा.

■ चेहऱ्यावरील त्वचेच्या समस्या कमी करण्यासाठी तुम्ही मुलतानी मातीसोबत काही इसेन्शिअल ऑईल मिसळू शकता.



सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खा आणि रोग टाळा

सकाळी : सकाळी रिकाम्या पोटी स्प्राउटेड चणे खाणे खूप फायदेशीर आहे, यामुळे शरीर स्वस्थ राहते आणि रोग जवळपास देखील येत नाही.



स्प्राउटेड चणे संपूर्ण किंवा वाटून साखर आणि पाण्यासोबत खाल्ल्याने शरीरातील प्रोटीनचे प्रमाण कायम राहते. तसेच स्नायू देखील मजबूत होतात. कोणत्याही स्वरूपात स्प्राउटेड चणे वापरणे फायदेशीर आहे. हे सलाड म्हणून देखील वापरले जातात. यामध्ये प्रोटीन, विटामिन आणि फायबरचे असलेले प्रमाण तणाव दूर करण्यास मदत करते.

स्प्राउटेड चणे वापरण्याचे ८ फायदे

■ चण्यामध्ये फायबरची मात्रा जास्त राहते. भिजवून खाल्ल्याने पोट किंवा कब्जा संबंधी समस्या टाळता येते.

■ मूत्र समस्या असल्यास किंवा पुन्हा पुन्हा मूत्र येत असेल तर चणा अत्यंत फायदेशीर आहे.

■ रिकाम्या पोटी चणे खाण्याने शरीरात अतिरिक्त प्रमाणात ग्लुकोज बनत नाही. मधुमेह देखील नियंत्रणात राहतो.

■ मानसिक तणाव असलेल्या लोकांसाठी चणा खूप फायदेशीर आहे.

■ सकाळी वाटलेल्या चण्यासोबत साखर किंवा पाणी मिसळून प्यायल्याने मानसिक तणाव दूर होतो.

■ कावीळ असलेल्या रुग्णांनी नियमितपणे चणे खावे. हे बरेच फायदेशीर असतात.

■ स्प्राउटेड चणे हिरव्या मुगासोबत खाल्ल्याने खाण्याने प्रोटिनची मात्रा वाढते.

■ याच्या नियमित सेवनाने थकवा दूर होण्यास मदत मिळते.

नाचता नाचता व्यायाम !

झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. एरोबिक्स, बॉलीवूड डान्स आणि झुंबा.. सध्या हे व्यायाम प्रकार प्रचंड लोकप्रिय आहेत. ३१ डिसेंबरला आणि नववर्षात छान 'फिट' दिसायचे 'लक्ष्य' ठेवून तरुणांबरोबर मध्यमवयीन वर्गही 'जिम'कडे वळतो आहे. मुळात नाचता नाचता व्यायाम होऊन जाणार ही संकल्पनाच आकर्षक आणि मजेशीर वाटावी अशी आहे. या व्यायाम प्रकारांनी शरीराला नेमका कसा व्यायाम होतो ते जाणून घेऊया एरोबिक्स ट्रेनर डॉ. पलक कुलकर्णी यांच्याकडून..



एरोबिक्स

सत्तरच्या दशकातच परदेशात एरोबिक्स लोकप्रिय होऊ लागले होते. त्यानंतर लोकांनी त्यांच्या व्यायामाच्या गरजेनुसार इतर प्रकार शोधून काढायला सुरुवात केली. 'झुंबा'ची सांगितली जाणारी जन्मकथाही मजेशीर आहे. ज्या व्यक्तीने हा झुंबा शोधला तेही एरोबिक्स ट्रेनर होते. एका दिवशी त्यांची एरोबिक्सची सीडी विसरली आणि लॅटिन प्रकारच्या डान्स सीडीवरून व्यायाम प्रकार घेतले गेले आणि त्यातून झुंबा आला असं म्हटलं जातं. पण झुंबा असो की बॉलीवूड डान्स. सगळ्याचा पाया एरोबिक्स हाच! एरोबिक्स म्हटलं म्हणजे तालबद्ध कवायत डोळ्यासमोर येते. पण उगीचंच कशाही उड्या मारणे किंवा इकडे-तिकडे वळून व्यायाम करणे म्हणजे एरोबिक्स नव्हे. हा प्रकार खूप व्यवस्थित आणि विचारपूर्वक ठरवलेल्या 'स्टेप्स'वर करायचा असतो. रोज तेच तेच करायचा कंटाळा येऊ नये म्हणून सतत वेगवेगळ्या 'कॉम्बिनेशन्स'मध्ये हालचाली केल्या जातात. त्यामुळे आज एरोबिक्समध्ये नवीन काय करणार याची उत्सुकता टिकून राहते. एरोबिक्समध्ये 'फ्लोअर एरोबिक्स' व 'बेंच एरोबिक्स' असे दोन प्रकार आहेत.

फ्लोअर एरोबिक्समध्ये सुरुवातीला 'वॉर्मअप' व्यायाम करावे लागतात. यातही नुसते कसेही हात-पाय हलवून चालत नाही. वॉर्मअपच्याही ठरलेल्या स्टेप्स असतात. त्यालाच जोडून ३० ते ४० मिनिटे पोटावरील स्नायूंना (ॲब्ज) तसेच कमरेखालच्या व वरच्या शरीराला व्यायाम दिला जातो. एरोबिक्समध्येसुद्धा बॉलीवूड डान्सच्या काही स्टेप्स करता येतात. ते करताना लोकांना मजा येते. व्यायामाची क्षमता म्हणजे 'स्टॅमिना' कमी असणाऱ्यांना या प्रकाराने सुरुवात करता येईल. जे लोक खूप वर्षांपासून एरोबिक्स करत आहेत त्यांना मात्र बेंच एरोबिक्स हा प्रकार अधिक आवडतो असं दिसून येतं. यातही वॉर्मअप असतोच. पण प्रत्यक्ष व्यायाम 'बेंच'वर म्हणजे ठरावीक उंचीच्या मोड्यांवर साधारण ३० मिनिटांसाठी असतो. कमरेखालचे आणि वरचे शरीर व हृदय यांच्यासाठी हा चांगला व्यायाम आहे. यात बेंचच्या स्टेप्स चढणे व उतरण्यात पायांचाही खूप वापर होतो.

झुंबा आणि बॉलीवूड डान्स

झुंबा या प्रकारात एकामागोमाग एक गाणी लावून त्यावर ठरावीक पद्धतीने बसवलेल्या नृत्यासारख्या स्टेप्स केल्या जातात. यातली संगीत व गाणी ठरलेली असतात. संगीत हेच झुंबाच्या आकर्षणाचे केंद्र आहे. संगीताच्या तालावर पाय आपसूक थिरकायला लागतात आणि नाचायचा हुरूप येतो. ७-८ वर्षांपूर्वीपासून झुंबा आपल्याकडे आला आणि हळूहळू लोकप्रियही होऊ लागला. बॉलीवूड डान्समध्येही वॉर्मअप चुकत नाही. पुढची ३० ते ४० मिनिटे व्यायाम करायचा असल्याने तो गरजेचा असतो. यात रोज हिंदी चित्रपटातील वेगळे गाणे घेऊन त्यावर शरीराला व्यायाम होईल, अशा प्रकारे नाचाच्या स्टेप्स बसवल्या जातात. यातला कोणताही नाच शिकणे व करणे अवघड नसते हे महत्त्वाचे.

गटाने करायच्या व्यायामात अनेकांना नवे मित्र भेटतात हे देखील व्यायाम लोकप्रिय होण्यामागचे कारण असू शकेल. एकट्यानेच चालायला किंवा पळायला जाणे किंवा एकट्यानेच जिममध्ये जाऊन व्यायाम करणे अनेकांना कंटाळवाणे वाटते आणि थोड्या दिवसांनी 'जिम'चा उत्साहसुद्धा कमी कमी होत जातो. याउलट संगीताच्या तालावर नाचण्याचा कंटाळा येत नाही, शिवाय बरोबरीच्या गटातले सगळेच नाचत असतात. त्यामुळे नव्याने आलेल्या व्यक्तीचा उत्साह टिकतो.

कुपोषणमुक्त महाराष्ट्राचे लक्ष्य!

उच्च जोखीम गरोदर मातांचे नियमित निरीक्षण, आदिवासी भागातील मुलींची हिमोग्लोबिन तपासणी

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

कुपोषणमुक्त महाराष्ट्र यासाठी राज्यातील माता मृत्युदर आणि बाल मृत्युदर कमी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हास्तरापर्यंत विशेष प्रयत्न करण्यात यावेत. विशेषतः आदिवासी भागातील मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, गर्भवती महिलांचे पोषण, रक्तक्षय नियंत्रण, कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी करणे आणि उच्च जोखीम गरोदर मातांचे नियमित निरीक्षण यावर भर देण्यात यावा. राज्यातील कुपोषण निर्मूलनासाठी आरोग्य, महिला व बालविकास, आदिवासी विकास तसेच स्थानिक प्रशासन यांनी समन्वयाने कार्य करून ठोस व मोजता येतील असे परिणाम साधावेत, असे आवाहन कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांनी केले.

दरम्यान, माता व बालकांच्या पोषणस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी जिल्हास्तरावर प्रभावी नियोजन व सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. डॉ. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त डॉ. सुनील भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाईत, सहायक संचालक डॉ. अविनाश आहेर, महिला व बालविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच आदिवासीबहुल जिल्ह्यांतील अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग) उपस्थित होते.



कुपोषणमुक्त महाराष्ट्र यासाठी राज्यातील माता मृत्युदर आणि बाल मृत्युदर कमी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हास्तरापर्यंत विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

या बैठकीत गंभीर तीव्र कुपोषित व मध्यम कुपोषित बालकांच्या स्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बालकांचे नियमित निरीक्षण, अद्ययावत नोंदी आणि प्रभावी उपचार व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला. कुपोषणाविषयी जनजागृती वाढविण्यासाठी चावडी वाचन, पोषण पंधरवडा, नियमित वजन मोजणी तसेच समुदाय सहभागाचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. कुपोषण कमी करण्यासाठी गावस्तरावर निधी उपलब्ध करून देणे, अमृत आहार योजनेच्या दरांचा पुनर्विचार करणे तसेच लाभार्थ्यांना केळी, अंडी आणि इतर पोषक आहाराचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. आयसीएमआरच्या अभ्यासानंतर आयर्न उपचारांबाबत योग्य अंमलबजावणी करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

बालकांच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस हे अत्यंत महत्त्वाचे मानून त्या कालावधीत विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. जिल्हानिहाय आढावा घेऊन औषधांचा पुरवठा, पोषणविषयक प्रशिक्षण आणि जनजागृती उपक्रम अधिक परिणामकारक करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बुडीत मजुरी वेळेत अदा करण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.

ॲनॉमली स्कॅन नियमितपणे करा

बैठकीत सिकल सेल आजाराच्या तपासण्या, विवाहपूर्व व गर्भधारणापूर्व सल्लामसलत, जोडप्यांचे समुपदेशन, ॲनॉमली स्कॅन, माता व बालकांसाठी थेट लाभ हस्तांतरण, पूरक आहार वितरण तसेच १०८ रुग्णवाहिका सेवेची गुणवत्ता सुधारण्याबाबत चर्चा झाली. गर्भधारणेच्या २० ते २२ आठवड्यांदरम्यान ॲनॉमली स्कॅन नियमितपणे करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

स्वप्न निश्चितच साकार होईल

कुपोषणमुक्त महाराष्ट्र हे केवळ शासकीय उद्दिष्ट नसून सामूहिक प्रयत्नांतून साध्य होणारे जनआंदोलन आहे. माता व बालकांचे आरोग्य सुधारल्याशिवाय राज्याचा सर्वांगीण विकास शक्य नाही. प्रत्येक विभागाने जबाबदारीने आणि परिणामकारकतेने काम केल्यास कुपोषणमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न निश्चितच साकार होईल, असे कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले.

शहरी भागात ह्यडे केअर सेंटरह्ण

दुर्गम व पाडा भागांमध्ये डे-केअर सेंटरचा प्रायोगिक तत्त्वावर अधिक वापर करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. शहरी भागातही व्हीसीडीसी आणि डे-केअर सेंटरची संकल्पना राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. अंगणवाडी सेविका, सीडीपीओ आणि डीपीओ यांना स्थानिक भाषेतील प्रशिक्षण साहित्य व पुस्तिका उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करा

धाराशिव, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मेळघाट, कोल्हापूर आणि निफाडसह विविध भागांतील कुपोषणाच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. काही भागांमध्ये उपाययोजनांची तीव्रता वाढविण्याची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले. जन्मजात दोष आणि विविध आरोग्य समस्यांचे लवकर निदान करण्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावरही भर देण्यात आला.

नौपाडा परिसरातील वाहतुकीत मोठे बदल...
३० जूनपर्यंत नवे नियम लागू



■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे शहरातील नौपाडा परिसरात वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. १ जून २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत नौपाडा वाहतूक उपविभागात विशेष वाहतूक नियमन लागू करण्यात आले असून काही मार्गांवर प्रवेशबंदी, वळणबंदी आणि 'नो पार्किंग'चे आदेश जारी करण्यात आले आहेत.

कॅडबरी जंक्शन ते नितीन जंक्शनदरम्यानच्या सेवा रस्त्यावर कुमार कंपनीकडून फ्री वे ब्रिजसंबंधित काम सुरू आहे. या कामासाठी सेवा रस्त्यावर बॅरिकेड्स उभारण्यात आल्याने रस्त्याची उपलब्ध जागा कमी झाली असून परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. याच पार्श्वभूमीवर ठाणे शहर वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी मोटार वाहन कायद्यांतर्गत विशेष आदेश जारी केले आहेत.

धर्मवीर कट सेवा रस्त्यावर प्रवेशबंदी

धर्मवीर कट सेवा रस्तामार्गे तीन हात नाका जंक्शनकडे जाणाऱ्या बस, अवजड मालवाहू वाहने आणि इतर सर्व वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. संबंधित वाहनांनी नाशिक-मुंबई महामार्गावरील स्लिप रोडचा वापर करून पुढील मार्गाने प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

'या' ठिकाणी डावीकडे वळण्यास मनाई

वासुदेव बळवंत फडके (भक्ती मंदिर) मार्ग, मोदी ह्युंदाई कट आणि HDFC कट येथून येणाऱ्या वाहनांना सेवा रस्त्यावर प्रवेशासाठी डावीकडे वळण्यास बंदी घालण्यात आली आहे. वाहनचालकांनी उजवीकडे वळून धर्मवीर कट मार्गाचा वापर करावा, असे वाहतूक विभागाने स्पष्ट केले आहे.

सेवा रस्त्यावर 'नो पार्किंग'

वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी होऊ नये यासाठी धर्मवीर कट सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना, तीन हात नाका जंक्शनकडे जाणाऱ्या मार्गावर वाहन पार्किंगला पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

आपत्कालीन सेवांना दिलासा

अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि पोलिस वाहने यांसारख्या आपत्कालीन सेवांना या निबंर्धातून सूट देण्यात आली आहे. दरम्यान, नागरिकांनी प्रवासाचे नियोजन आधीच करावे, पयार्यी मार्गाचा वापर करावा आणि ड्युटीवरील वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन ठाणे वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे.

गारगाई धरणाच्या कामाला ऑक्टोबरमध्ये सुरुवात... मुंबईला दररोज मिळणार 440 दशलक्ष लिटर पाणी

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईकरांची पाण्याची तहान भागविण्यासाठी मुंबई महापालिका गारगाई धरणाच्या प्रत्यक्ष कामाला ऑक्टोबर महिन्यात सुरुवात करणार आहे. सदर धरणाचे काम 2029 मध्ये पूर्ण करण्यात येऊन मुंबईला दररोज 440 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. यासंदभार्तील माहिती अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी आज स्थायी समितीच्या बैठकीत दिली. मुंबईची वाढती लोकसंख्या पाहता मुंबईला दररोज 2041 मध्ये 6,400 दशलक्ष लिटर इतक्या पाण्याची गरज भासणार आहे. सध्या मुंबईला दररोज 4,100 दशलक्ष लिटर इतक्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. वास्तविक, सध्या मुंबईला दररोज 4,600 दशलक्ष लिटर इतक्या पाण्याची आवश्यकता आहे. मात्र 500 दशलक्ष लिटर इतका कमी पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची कबुली अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी यावेळी दिली. मात्र गारगाई धरण प्रकल्प मार्गी लागल्यावर मुंबईला 440 दशलक्ष लिटर जास्त पाणीपुरवठा होईल. त्यामुळे मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळेल, अशी शक्यता देखील अभिजित बांगर यांनी यावेळी व्यक्त केली. गारगाई धरण प्रकल्पासाठी जवळजवळ सर्वच परवानग्या घेण्यात आलेल्या असून फक्त दोन परवानग्या बाकी आहेत. त्या केंद्राकडून परवानग्या जुलै महिन्यात मिळतील आणि धरणाच्या उभारणीला येत्या ऑक्टोबर महिन्यात सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली.



कोयना धरणाचे वाया जाणारे पाणी मुंबईकडे वळविण्याची मागणी

दरम्यान, कोयना धरणांतून वीज निर्मितीनंतर मोठ्या प्रमाणात सोडून देण्यात येणारे पाणी मुंबईकरांसाठी वळविण्यात यावे. त्यामुळे मुंबईकरांना जास्त पाणी उपलब्ध होईल, अशी मागणी भाजपचे नगरसेवक प्रकाश दरेकर यांनी यावेळी केली. तर दुसरीकडे गारगाई धरणाचे काम, परवानग्या आदी गेल्या 12 वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे गारगाई धरण प्रकल्प रखडला असल्याचा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नगरसेविका सईदा खान यांनी उपस्थित केला. तसेच, मुंबईची वाढती तहान भागविण्यासाठी कोयना धरणातील वाया जाणारे पाणी वळविण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

53 वर्षीय मौलानाने मदरशात 10 वर्षीय मुलीसोबत... भयंकर प्रकरण आलं सोमर

■सोलापूर। प्रतिनिधी,

सोलापूर शहरातील नई जिंदगी परिसरातून एक अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. धार्मिक शिक्षणासाठी मदरशात जाणाऱ्या 10 वर्षीय चिमुकलीवर त्याच मदरशातील 53 वर्षीय मौलानाने अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मौलाना मोहम्मद उमर मोहम्मद हुसेन रजवी (वय 53, रा. सोलापूर) असे या आरोपीचे नाव आहे.

मौलानाचे पीडित मुलीसोबत गैरवर्तन

फियार्दीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी मौलानाने गेल्या काही काळापासून पीडित मुलीसोबत गैरवर्तन केले होते. एवढेच नव्हे तर, इतर काही अल्पवयीन मुलींशीही त्याने अयोग्य वर्तन केले असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शिक्षणाच्या पवित्र ठिकाणी घडलेल्या या



घटनेमुळे सोलापूर शहरात आणि विशेषतः नई जिंदगी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. धार्मिक शिक्षणासाठी पालकांनी आपल्या मुलांना विश्वास ठेवून पाठवलेल्या मदरशातच असा प्रकार घडल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

आरोपीवर कठोर कारवाईची मागणी

या दुदैर्वी घटनेची माहिती मिळताच पीडित मुलीच्या वडिलांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी मौलाना मोहम्मद उमर मोहम्मद हुसेन रजवी याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेची संबंधित कलमे, पॉक्सो कायद्याचे कलम 8, 10 व 12, तसेच बाल न्याय (जेजे) अधिनियम 2015 चे कलम 75 अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांनी या प्रकरणाचा निष्पक्ष आणि सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.दरम्यान, एमआयडीसी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत असून तपासानंतर सर्व माहिती समोर येईल अशी माहिती पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी दिलीय.

'आईच्या प्रियकराने माझ्यावर...'
चंद्रपूरात 15 वर्षीय मुलीने सगळंच सांगितलं

■चंद्रपूर। प्रतिनिधी,

चंद्रपूर जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. एका आईने पैशांच्या लोभापायी पोटच्या दोन मुलांचा चार लाखांना सौदा केल्याचा प्रकार घडला आहे. इतकंच नव्हे तर आपल्या पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीच्या नवजात बाळाला विकण्याचाही घाट तिनं घातला होता. मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे प्रकरण उघडकीस आले. पोलिसांनी या प्रकरणी मुख्य आरोपी आईसह दोन खरेदीदार महिलांना अटक केली असून, न्यायालयाने आरोपी आईची 1 जूनपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे, तर खरेदीदार महिलांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार

या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या महिलेच्या नवऱ्याचे काही वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यानंतर तिची ओळख अजय फुलझेले नावाच्या व्यक्तीशी झाली होती. यानंतर दोघांनी लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचा निर्णय घेतला. या दोघांसोबत त्या महिलेची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी देखील राहू लागली. दरम्यानच्या काळात, मुख्य सूत्रधार अजय फुलझेले याने या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केले, ज्यामध्ये ती गर्भवती राहिली. बदनामीच्या भीतीने अजय आणि त्या मुलीच्या आईने मुलीला प्रसूतीसाठी नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. तिथे कुणाला संशय येऊ नये म्हणून 'पुराच्या पाण्यात आमची सर्व कागदपत्रे वाहून गेली' असा बनाव रचला आणि मुलीचे वय 20 वर्षे असल्याचे सांगण्यात आले.

चार लाखांना विकली मुले

मात्र, वैद्यकीय तपासणी दरम्यान डॉक्टरांना मुलीच्या वयाबाबत संशय आल्याने त्यांनी तत्परता दाखवत नागपूरच्या अजनी पोलिसांना याची माहिती दिली. अजनी पोलिसांनी तात्काळ या प्रकरणी 'झिरो एफआयआर' नोंदवून पुढील तपासासाठी हे प्रकरण चंद्रपूर पोलिसांकडे वर्ग केले. चंद्रपूरच्या रामनगर पोलिसांनी पीडित अल्पवयीन मुलीचा सविस्तर जबाब नोंदवला. पोलिसांना चौकशी दरम्यान हा प्रकार केवळ लैंगिक शोषणापुरता मर्यादित नसून यामागे बालतस्करीचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचा संशय आला. त्यानुसार पोलिसांनी आरोपी मातेला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच तिने सगळी कहाणी सांगितली. तिने यापूर्वीच आपल्या दोन मुलांना प्रत्येकी दोन-दोन लाख रुपयांना विकल्याची आणि आता मुलीच्या नवजात बाळालाही विकण्याची तयारी सुरू असल्याची धक्कादायक कबुली दिली.

मुख्य सूत्रधार फरार

या संतापजनक खुलाशानंतर पोलिसांनी गुन्ह्यात मानवी तस्करी आणि पॉक्सो (ढडउरड) कायद्यान्वये कडक कलमे जोडली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मुलांची खरेदी करणाऱ्या एका महिलेला तेलंगणातील कागजनगर येथून तर दुसऱ्या महिलेला चंद्रपूरमधून अटक केली. विकली गेलेली दोन्ही निष्पाप मुले सुखरूप असून त्यांना संरक्षणासाठी शहरातील अनाथालयात पाठवण्यात आले आहे. शनिवारी (30 मे) पोलिसांनी तिन्ही आरोपी महिलांना न्यायालयात हजर केले होते. या संपूर्ण प्रकरणाचा मुख्य सूत्रधार आणि नराधम अजय फुलझेले हा सध्या फरार असून रामनगर पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

मातीत गाडला गेला मजूर, दहा दिवसांनी बाहेर आला पाय... 'त्या' रात्री काय घडलं?

पोलिसांनी काय सांगितलं?

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. मजुराचा मृत्यू मातीखाली दबल्यामुळेच झाला की त्यामागे इतर काही कारण आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत. गुलरिहा पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक जगदीश पाल यांनी सांगितले की, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून शवविच्छेदन अहवाल आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. दरम्यान, या वेदनादायक घटनेने बांधकाम क्षेत्रातील सुरक्षा व्यवस्था आणि देखरेखीच्या त्रुटींवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले असून, स्थानिक नागरिकांकडून या अपघाताला मोठी निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचे म्हटले जात आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

एका बांधकाम सुरु असलेल्या रस्त्यावर एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. गुरुवारी (4 जून) सकाळी रस्ता बांधकामांतर्गत दुभाजकावरील माती सपाट करण्याचे काम सुरू असताना, लोकांना मातीच्या ढिगाऱ्याबाहेर आलेला एक पाय दिसला. सुरुवातीला तो एखादा कपडा असावा असा अंदाज नागरिकांनी वर्तवला, मात्र जवळ जाऊन पाहिल्यावर हा प्रकार गंभीर असल्याचे लक्षात आले. यानंतर तातडीने पोलिसांना पाचारण करण्यात आले आणि पोलिसांनी जेसीबीच्या साहाय्याने माती हटवून मृतदेह बाहेर काढला. उत्तर प्रदेशातील गोरखपूरमधील ही घटना आहे.

मजुराचा मातीत गुदमरुन मृत्यू

मृतदेहाजवळ पोलिसांना एक पिशवी सापडली असून, त्यात काही भाकरी, भाजी,



देशी दारूचा पाऊच, चिलम, मोबाईल चार्जर आणि एक शाल होती. या साहित्यावरून असा अंदाज लावला जात आहे की, हा मजूर रात्री तिथेच थांबला होता आणि दुभाजकावर शाल अंथरून झोपला होता. हा अपघात भटहट शहराजवळ घडला असून, रात्रीच्या वेळी माती घेऊन आलेल्या डंपर चालकांना दुभाजकावर कोणीतरी झोपले आहे याची पुसटशीही कल्पना नव्हती, असे स्थानिक लोकांचे म्हणणे आहे. डंपरमधून थेट मजुराच्या अंगावरच माती टाकली गेल्याने गुदमरून त्याचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त होत आहे; मात्र पोलीस सध्या या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.

मृतदेह सापडल्यानंतर काही वेळातच एक महिला आपल्या दोन मुलांसह घटनास्थळी पोहोचली. तिने मृतदेहाची ओळख पटवली असून, मृत व्यक्ती तिचे पती मिंटू असल्याचे सांगितले. मिंटूची ओळख पटताच कुटुंबियांनी एकच आक्रोश केला. मृत मजूर मिंटू हा गेल्या पाच वर्षांपासून गुलरिहा येथील तरकुलहा भागात आपल्या सासरच्या घरी पत्नी नीता देवी आणि मुलांसह राहत होता. तो मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवायचा. पत्नीने दिलेल्या माहितीनुसार, मिंटू सुमारे 10 दिवसांपूर्वी जंगल कौडिया परिसरात रस्ता बांधकामाच्या कामासाठी गेला होता, त्यानंतर तो घरी परतलाच नव्हता.

मुलाने शेतात शौच केल्याने आईला रॉडने बेदम मारहाण... नंतर ग्रामस्थांकडून दगडफेक

■मुंबई। प्रतिनिधी,

लहान मुलाने शौच केल्याच्या वादातून एका महिलेला लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. या घटनेनं परिसर पूरता हादरून गेला. पोलिसांच्या उपस्थितीनंतर स्थानिकांनी संताप व्यक्त करत दगडफेक केली. पोलिसांच्या पथकाने आंदोलक आणि उपस्थितांवर दगडफेक केली. पोलिसांनी पथकाने आंदोलकांवर लाठीचार्ज करून त्यांना पांगवण्याचा प्रयत्न केला होता. संबंधित प्रकरण भोरे पोलीस ठाणे परिसरात घडल्याचे वृत्त आहे. ही घटना बिहारच्या गोपालगंज येथील आहे.

शेतात घाण पाहून तरुण संतापला

घटनेनुसार, मृत व्यक्तीची सुनील चौहान अशी ओळख पटली. पोलीस उशिरा घरी पोहोचल्याचा आरोप करत गावकऱ्यांनी भोरे-मिरगंज मुख्य रस्ता अडवला आणि प्रशासनाविरोधात आंदोलन करण्यास सुरुवात केली. दरम्यान, आतिश चौहान नावाच्या तरुणाची सुनील चौहान नावाच्या तरुणाच्या घरामागे एक शेती होती. सकाळी सुमारे साडेदहा वाजता तो शेतावर गेला असता, घाण पाहून तो संतापला.

शौच केल्याच्या आरोपावरून महिलेवर रॉडने हल्ला

त्याने सुनील चौहानच्या कुटुंबाने मुलांवर शौच केल्याचा आरोप करत गोंधळ सुरू केला. अशातच आतिश चौहानने सुमन देवीवर रॉडने हल्ला करत तिच्या डोक्यात प्राणघातक हल्ला केला. नंतर डोक्याला गंभीर दुखापत झाली. तिच्या कुटुंबीयांनी तिला तातडीने रूग्णालयात दाखल करण्यात आले, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलेय

गावकऱ्यांनी पळून जाणाऱ्या आरोपी आतिश चौहानला पकडून पोलिसांकडे दिले. प्रकरणाची माहिती देऊनही पोलिसांनी वेळेवर घटनास्थळी धाव घेतली नाही, असा ग्रामस्थांचा आरोप आहे. संतप्त झालेल्या रहिवाशांनी रस्ता अडवून, आग लावली आणि घोषणाबाजी केली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी गोपालगंज रुग्णालयात पाठवला.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com